Vol 4 Issue 5 Nov 2014

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-5 | Nov-2014
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# संत ज्ञानेश्वर : मतमतांतरे व समाजमनातील स्थान

f'kokth dkGs

***सारांश :-*** वारकरी संप्रदायाच्या प्रारंभ काळात संत नामदेव व संत ज्ञानदेव यांच्या प्रभावामुळे अनेक जातीतील संत पंढरपुरी जमा होत गेले. पांडुरंगावर अपार श्रद्धा असलेले नामदेव आणि लहान वयातच अफाट बौध्दिक सामर्थ्याचा चमत्कार घडवणारे ज्ञानदेव यांच्या सानिध्यामुळे वारकरी संप्रदाय जनमानसात रूजण्यास मदत झाली.

### *प्रस्तावनाः–*

वयाने सर्वात लहान असूनही संत मंडळीत ज्ञानदेव अतिशय पुजणीय होते. वारकरी संप्रदायाचा पाया रचण्याचे महत्त्वाचे कार्य करण्याचा मान त्यांना दिला जातो. या संप्रदायाचा पाया एवढा मजबूत आहे, म्हणूनच या संप्रदायाची इमारत आजही भक्कम आहे. त्यांच्या संदर्भात तत्कालीन व नंतरच्या काळातील संतांनी ज्ञानेश्वरासंबंधी ज्या गौरवपर रचना केल्या आहेत त्यावरून त्याच्या संप्रदायातील स्थानाची कल्पना येते. यातील काही निवडक रचना येथे विचारात घेतल्या आहेत.

### *1. संत नामदेव यांची स्तुती सुमने :*

संत नामदेव ज्ञानेश्वरांच्या समकालीन होते. तसेच दोघांनी बराच काळ एकत्र घालविला आहे. त्यांनी सोबत तीर्थयात्रा केली तसेच ज्ञानदेवांच्या समाधीप्रसंगी नामदेव उपस्थित होते. नामदेवांच्या आदि–तीर्थावळी–समाधी या अभंगाच्या प्रकरणांतून संपूर्ण ज्ञानेश्वर चरित्र उघड होते. अशा संत नामदेवांची ही अभंगरचना ज्ञानदेव व ष्ज्ञानेश्वरीष यांचा गौरव करणारी आहे.

"ज्ञानराज माझी योग्याची माउली । जेणे निगमवल्ली प्रगट केली ।।1 ।।
गीताअलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली ।।2 ।।
अध्यात्मविद्येचे दाविलेसे रूप । चैतन्याचा दीप उजळिला ।।3 ।।
छपन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवी नाव उभारिली ।।4 ।।
श्रवणाचे मिषे बैसावे येऊनी । साम्राज्यभुवनी सुखी नांदे ।।5 ।।
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।।6 ।।"

### *2. संत एकनाथांच्या दोन रचना :*

संत एकनाथ हे पैठण येथील विद्वान संत होते. 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ पाठभेदांमुळे अशुध्द झालेला होता. संत एकनाथांनी शके 1506 मध्ये या ग्रंथाची शुध्द प्रत तयार केली. अशा संत एकनाथांची संत ज्ञानेश्वरांच्या सामर्थ्याचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

"कैवल्याचा पुतळा । प्रगटला भूतळा । चैतन्याचा जिव्हाळा । ज्ञानोबा माझा ।।1 ।।
साधका मायबाप । दरूशने हरी ताप । सर्वाभूती सुखरूप । ज्ञानोबा माझा ।।2 ।।
ज्ञानियांचा शिरोमणी । वंद्य तो का पूज्यस्थानी । कचंतकाचा चिंतामणी । ज्ञानोबा माझा ।।3 ।।

चालविली जड भिंती । हरली चांगयाची भ्रांति । मोक्षमार्गीचा सांगाती । ज्ञानोबा माझा ।। 4 ।।
रेड्यामुखी वेद बोलविला । गर्व द्विजांचा हरविला । शांतिरूप प्रगटला । ज्ञानोबा माझा ।। 5 ।।
ब्रह्मसाम्राज्यदीपिका । वर्णियेली गीतेची टीका । विठोबाचा प्राणसखा । ज्ञानोबा माझा ।। 6 ।।
गुरूसेवेलागी जाण । शरण एका जनार्दन । त्रैलोक्याचे जीवन । ज्ञानोबा माझा ।। 7 ।।"

अशाप्रकारची अभंग रचना करणाऱ्या संत एकनाथांनी 'ज्ञानदेव' हे नाव एक चतुराक्षरी मंत्र आहे, अशी कल्पना करून या नामाचा महिमा वर्णन केला आहे. नावातील ही अक्षरे व त्याचे महत्त्व याची चपखल गुंफण खालील अभंगात अनुभवता येते.

"ज्ञानदेव चतुराक्षरी जप करी तू सर्वज्ञा । ज्ञानाज्ञानाविरहित ब्रह्मप्राप्तीची संज्ञा ।
ज्ञात ज्ञेय जागे होय ऐसी प्रतिज्ञा । ज्ञानाग्नीने पापे जळती हे ज्याची आज्ञा ।। 1 ।।
ज्ञानदेव ज्ञानदेव म्हणता ज्ञान देव देतो । वासुदेव होतो अखंड वदनी वदे तो ।। ध्रु ।।
नररूपे विष्णु अवतरला हा भगवान । नदीनद वापीकूप पहाता उदक नव्हे भिन्न ।
नवल हेची पशु म्हैसा करितो वेदाध्ययन । नमन करूनि सद्भावे जपता होय विज्ञान ।। 2 ।।
देवाधिश देव भक्तांप्रति वर दे । देता वर ब्रह्मांडी आनंद कोंदे ।
देशिकराज दयानिधि अलंकापुरी जो नांदे । देशभाषा ज्ञानदेवी गीतार्थ वदे ।। 3 ।।
वक्ता श्रोता श्रवणे पठणे पावती समभाव । वर्णू जाता अघटित महिमा होतो जिव शिव ।
वदुनी अनन्य एकाजनार्दनी धरी दृढभाव । वर्षति निर्जर ज्ञानदेव नामे पुष्पांचा वर्षाव ।। 4 ।।"

### *3. संत बहेणाबाईंची कल्पना :*

संत तुकाराम महाराजांची अनुग्रहित शिष्या 'संत बहेणाबाई' यांनी वारकरी संप्रदाय अर्थात भागवत धर्म म्हणजे एक इमारत आहे, अशी कल्पना करून तिची रचना व उभारणी करण्याकामी योगदान दिलेल्या संतांचा गौरव अभंग लिहिलेला आहे. या अभंगात 'संत ज्ञानदेवां' चा उल्लेख या इमारतीचा पाया रचणारा म्हणजेच खऱ्या अर्थाने या संप्रदायाचा संस्थापक असा केलेला आढळून येतो, तो अभंग खालीलप्रमाणे आहे.

"संतकृपा जाली । ईमारत फळा आली ।। 1 ।।
ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।। 2 ।।
नमा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।। 3 ।।
जनार्दन ऐकनाथ । खांब दिल्हा भागवत ।। 4 ।।
तुका जालासे कळस । भजन करा सावकास ।। 5 ।।
बहेणि फडकती ध्वजा । निरोपण केले वोजा ।। 6 ।।"

### *4. निवडक संत ज्ञानेश्वर गौरव*

"ज्ञानाबाई आई आर्त माझे पायी । धावुनीया येई झडकरी ।। 1 ।।
बहु कासावीस होतो माझा जीव । कळवळ्याची कीव येवो द्यावी ।। 2 ।।
नामयाची जना म्हणावी आपुली तुम्ही आपंगिली मायबापा ।। 3 ।। " (संत जनाबाई)
" श्री ज्ञानराजे केला उपकार मार्ग हा निर्धार दाखविला ।। 1 ।।
विटेवरी उभा वैकुंठनायक आणि पुंडलीक चंद्रभागा ।। 2 ।।" (संत सेना न्हावी)
" विष्णूचा अवतार सखा माझा ज्ञानेश्वर ।। 1 ।।
चला जाऊ अलेकापुरा संतजनांच्या माहेरा ।। 2 ।।" (संत सेना न्हावी)
" सर्व सुखाची लहरी । ज्ञानाबाई अलंकापुरी ।। 1 ।।
शिवपीठ हे जुनाट ज्ञानाबाई तेथे मुकुट ।। 2 ।।
वेदशास्त्र देती ग्वाही म्हणती ज्ञानाबाई आई ।। 3 ।।
ज्ञानाबाईचे चरणी शरण एकाजनार्दनी ।। 4 ।।" (संत एकनाथ)
"कृपाळू उदार ज्ञानेश्वर तया नमस्कार वारंवार ।। 1 ।।

न पाहे यातीकुळाचा विचार भक्त करूणाकर ज्ञानाबाई । । 2 । ।'' (संत एकनाथ)
''जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ अंगी ऐसे बळ रेडा बोले ।।1 ।।
करील ते काय नव्हे महाराज परी पाहे बीज शुध्द अंगी ।।2 ।।
जेणे हे घातली मुक्ताची गवांदी मेळविली मांदी वैष्णवांची ।।3 ।।
तुका म्हणे तेथे सुखा काय उणे राहे समाधाने चित्ताचीया । । 4 । ।'' (संत तुकाराम)

याशिवाय समकालीन व ज्ञानेश्वरोत्तर संतांनी ज्ञानदेवांच्या गुणगौरवपर अभंग रचना केलेल्या आढळतात. संत ज्ञानेश्वरांच्या गौरवपर जेवढ्या इतर संतांच्या संदर्भात आढळत नाहीत, यातून वारकरी संतमेळ्यातील त्यांचे स्थान, श्रेष्ठतव व त्याच्याबद्दलचा आदरभाव लक्षात येतो.

### *5. संत ज्ञानदेवांच्या दोन आरत्या :*

'आरती' म्हणजे आपल्या आराध्य दैवताचे गुणगाण करणारी रचना असते. याद्वारे दैवताची स्तुती करून त्याचे माहात्म्य वर्णन केलेले असते. वारकरी संप्रदायामध्ये देवाच्या आरत्यांप्रमाणेच संताच्या आरत्याही प्रचलीत आहेत. संत ज्ञानेश्वरांची संप्रदायातील आरती खालीलप्रमाणे आहे.

''आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा । सेविति साधुसंत । मनु वेधला माझा ।।ध्रु. ।।
लोपले ज्ञान जगी । हित नेणते कोणी । अवतार पांडुरंग । नाव ठेवियले ज्ञानी ।।1 ।।
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केले । रामाजनार्दनी पायी टकची ठेले ।।2 ।।''

रामा जनार्दन यांच्या 'संत ज्ञानेश्वर' महाराज यांच्या या आरती व्यतिरिक्त 'संत निळोबाराय' यांचीही एक आरती आहे.

'' होता कृपा तुमची पशू बोले वेद । निर्जिव चाले भिंत महिमा अगाथ ।
भगवद्गीता टीका ज्ञानेश्वरी शुध्द । करूनि भाविक लोका केला निजबोध ।।1 ।।
जय देव जय देव जय ज्ञानसिंधु । नामस्मरणे तुमच्या तुटती भवबंधू ।।ध्रु. ।।
चौदाशे वर्षाचे तप्तीतीरवारसी । येउनि चांगदेव लागले चरणांशी ।
करूनि कृपा देवे अनुग्रहिले त्यासी । देउनि आत्मज्ञान केले सहवासी ।।3 ।।
समाधिसमयी सकळ संतसमुदाय । घेउनि सुरवर आले श्रीपंढरीराव ।
नारी अजानवृक्ष सुवर्णपिंपळ समाव । जाणुनि महिमा निळा मागे चरणातळि ठाव ।।3 ।।

### *6. संत ज्ञानदेवांचे भक्तांच्या मनातील स्थान :*

पुरोगामी विचारधारा आत्मसात केलेल्या विज्ञानयुगातील आजच्या महाराष्ट्रातील तमाम जनमानसाच्या मनात अजूनही वारकरी संप्रदायाबाबत आदराची भावना आहे. सर्वांना सहज अंगिकारता येतील अशी साधी सोपी आचरण तत्त्वे असल्यामुळे हा संप्रदाय लोकप्रिय झालेला आहे. अशा संप्रदायाची मूळ बैठक घडविण्यात संत ज्ञानेश्वरांचे मोलाचे योगदान आहे. कपाळी गोपीचंदन टिळा व बुक्का, गळ्यात तुळशीची माळ, नियमित पंढरीची वारी आणि एकादशी व्रत अशी सहजसाध्य आचारसंहिता या संप्रदायात पाळली जाते. ज्ञानदेवांच्या लोभस व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाने अठरापगड जातीतील संतमेळा त्यांच्याभोवती जमा झाला, तेव्हापासून अ़द्याप या संप्रदायात जाती व धर्मभेद मानला जात नाही.

अठरापगड जातीतील सर्वसामान्य जनांना पांडुरंगाच्या भक्तीचे सोपे साधन उपलब्ध करून देणाऱ्या संताला आजही समाज 'माउली' म्हणतो. माणसाला सर्वात जवळ असलेले नाते आईचे असते. आपले दुःख, गाऱ्हाणे आईजवळ सांगायला कुणालाच संकोच वाटत नाही. या संप्रदायाच्या लाखो अनुयायांचे म्हणणे ऐकण्याचे सामर्थ्य फक्त कोमल ह्रदयाच्या ज्ञानेश्वरांमध्येच आहे, हे ओळखून भक्तांनी त्यांना 'माउली' या उपाधीने गौरविलेले आहे. स्त्रीच्या अशा महन्मंगल स्वरूपाच्या नात्याने पुरूषाला संबोधण्याचे जगातील हे एकमेवद्वितीय उदाहरण आहे.

अशा समाजमनात 'माउली' चे स्थान मिळालेल्या व 'महाराव' या उपाधीने गौरविलेल्या समन्वयवादी विचारांच्या ज्ञानी, विद्वान व मराठी भाषेवर अतोनात प्रेम असणाऱ्या संत ज्ञानदेवांच्या इतर समकालीन व

उत्तरकालीन संतांच्या व सामान्य जनांच्या आदरातून त्याचे मोठेपण सहज लक्षात येते.

एकीकडे वारकारी संतांच्या व सर्वसामान्य वारकऱ्यांच्या मनात संत ज्ञानदेवांना आदराचे स्थान लाभलेले असतानाच अभ्यासक व संशोधकांना त्यांच्या जीवन व वाङ्मयाने विचारप्रवृत्त केले आहे. त्यामुळे मराठीतील अनेक विचारवंतांनी त्यांचे जन्मशक, जन्मस्थळ, 'ज्ञानेश्वरी' लेखनाचे स्थळ इतकेच नव्हेतर ज्ञानेश्वर 'एक की दोन' यावर वेगवेगळी मते मांडून खंडणमंडणही केले आहे. यामधील काही विषयासंबंधी सबळ पुराव्यानिशी निर्णय झाले आहेत तर काही विषयासंदर्भात आजही वेगवेगळी मते आढळून येतात.

### *7. संत ज्ञानेश्वरांचे जन्म व समाधी शक :*

"त्र्यांण्णवाच्या साली ज्ञानेश्वर प्रगटले । सोपान देखिले शाण्णवांत ।।2 ।।"

या संत जनाबाईच्या अभंगातील ओळीवरून ज्ञानेश्वरांचा जन्म शके 1193 मध्ये झाला असे मानावे लागते, मात्र हा अभंग जनाबाईचा नसून तो प्रक्षिप्त असल्याचे काही संशोधक मानतात. कै. भिंगारकर बुवा, कै. ल. रा. पांगारकर तसेच महाराष्ट्र सारस्वत कर्ते वि. ल. भावे वगैरे काही संशोधक ज्ञानेश्वरांचा जन्म शके 1197 मध्ये झाल्याचे नमुद करतात.

ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली तेव्हा त्यांचे वय बावीस वर्षाचे होते, हे सर्वमान्य आहे. 'जगदोध्दार केला संसारी । बावीस वरूषे असतां पै ।।' हा नामदेव गाथेचा दाखला तसेच 'बाल छंदा बावीस जन्में । तोडिली भवाब्धीची कर्मे ।' हा स्वतः ज्ञानदेवांच्या अभंगातील दाखला, समाधीच्या वेळी ज्ञानदेवांचे वय बावीस वर्षाचे होते हे सिध्द करतो.

जवळपास सर्वच अभ्यासक व संशोधक ज्ञानेश्वरांचे वय बावीस वर्षाचे होते हे मान्य करतात, मात्र त्यामुळे जन्मसालानुसार काही 1215 हे समाधी शक सांगतात तर काही 1218 हे वर्ष ठरवितात. श्री. ज.र. आजगावकरांसारखे काही समन्वयवादी विचारवंत या वादाला फारसे महत्त्व न देता या दोन्हीपैकी कोणतीही एक उपपत्ती सत्य असावी किंवा दोन्हीही चुकीच्या असाव्यात अशी भूमिका मांडताना आढळतात.

### *8. ज्ञानेश्वर एक की दोन :*

'ज्ञानेश्वरी' कर्ते व अभंग लिहिणारे ज्ञानेश्वर हे एकच नसून या दोन वेगवेगळ्या व्यक्ती होत्या, असा काही अभ्यासकांचा निष्कर्ष आहे. कै. शिवराम एकनाथ भारदे बुवा यांनी भारद्वाज या टोपण नावाने 1898–99 साली सुधारक या पत्रात लेख लिहून प्रथम हा वाद उपस्थित केला. 1931 साली गंगाधर गणेश दाभोळकर यांनी ज्ञानदेव आणि ज्ञानेश्वर या पुस्तकात हा लेख पुन्हा समाविष्ठ केला. भारदे बुवांच्या मते 'ज्ञानेश्वरी' कर्ते 'ज्ञानेश्वर' हे आपेगावाचे असून ते नाथपंथी, हटयोगी, अद्वैतावादी, निर्गुणोपासक होते, 'अभंग' कर्ते 'ज्ञानदेव' हे चौदाव्या शतकातील असून ते सगुणोपासक, भक्तीमार्गी व द्वैतवादी होते.

अभंग रचना करणाऱ्या ज्ञानदेवांचे आराध्य दैवत पंढरपूरच्या विठ्ठलाचा उल्लेख 'ज्ञानेश्वरी' मध्ये आढळत नाही, तसेच अभंग व इतर ग्रंथातील शब्दकळा व वापरलेली नाममुद्रा यात फरक आढळतो या मुद्यांवरून हा निष्कर्ष काढण्यात आलेला होता. मात्र भारद्वाज यांच्या सर्व आक्षेपांचे खंडन करून कै. भिंगारकरबुवा, कै. ल. रा. पांगारकर, वै. शं. वा. दांडेकर, डॉ. रा.द. रानडे, प्रा. गजेंद्रगडकर, डॉ. शं.दा. पेंडसे इत्यादी अभ्यासकांनी ही मते खोडून काढली आहेत. ज्ञानेश्वरी व अभंग यातील भाषा, सगुणनिर्गुण विवेक, तत्त्वपध्दती, दृष्टांन्ताची मांडणी करण्याची रीत, काव्यरीती, गुरूपरंपरेची उल्लेख अशा अनेक दाखल्यांच्या आधाराने या सर्व रचनांचा कर्ता एकच एक असून तोच ज्ञानदेव किंवा ज्ञानेश्वर आहे, असे मत मांडले आहे. हा वाद आता मिटल्यासारखा आहे.

### *9. ज्ञानेश्वरांचे जन्मस्थान :*

ज्ञानेश्वरांचे जन्मस्थळ आळंदी आहे अशी सर्वमान्यता असली तरी ज्ञानेश्वरादी भावंडांचा जन्म आपेगावी झाला असे काही अभ्यासकांचे मत आहे. शं. गो. तुळपुळे यांनी 'पाच संतकवी' या ग्रंथात 'आपेगावी जन्माला आलेली ही चार भावंडे मोठी होऊ लागली' असा उल्लेख केलेला आहे.

वडिलांच्या मृत्यूनंतर विठ्ठलपंत आपले श्वसूर सिध्दोपंताच्या आधाराने आळंदीलाच वास्तव्य करून होते. या भावंडांच्या मुंजीच्या वेळी विठ्ठलपंतांनी प्रथमतः आळंदीच्या ब्राह्मणांना विनंती केलेली आहे. आपेगाव हे गाव पैठणपासून अतिशय जवळ आहे. ज्ञानेश्वरादी भावंडे पैठणच्या ब्रह्मवृंदाला भेटली तेव्हा त्यांना 'तुम्ही कोण? व कोणत्या गावचे?' असा प्रश्न केला. या भावंडाचा जन्म आपेगावचा असता तर या मंडळींना असा प्रश्न

विचारण्याची आवश्यकता पडली नसती. या भावंडांचा जन्म आळंदी येथेच झाल्याची वारकरी संप्रदायातही मान्यता आहे.

### *10. 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाचे लेखनस्थळः*

समस्त मानव जातीच्या कल्याणाची कामना करणारा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ ज्ञानदेवांनी कोठे लिहून पूर्ण केला याबाबतही काही मतमतांतरे आहेत. काही अभ्यासक हा ग्रंथ आपेगावी लिहिला असे मानतात तर बहुतांश संशोधक 'नेवासा' येथे ग्रंथ रचना झाल्याचे मान्य करतात.

'ज्ञानेश्वरी' च्या अठराव्या अध्यायाच्या अखेरच्या काही ओव्यात या ग्रंथाच्या निर्मिती स्थळाबाबत नोंद केलेली आहे.

> "ऐसे युगी परी कळी । आणि महाराष्ट्रमंडळी । श्रीगोदावरीचा कूली । दक्षिणिली ।।
> त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचकोशक्षेत्र । जेथ जगाचे जीवसूत्र । श्रीमहालया असे ।।
> यदूवंशविलासु । जो सकळकळानिवासु । न्यायाते पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ।।
> तेथ महेशान्वयसंभूते । श्रीनिवृत्तीनाथसुते । केले ज्ञानदेवे गीते । देशीकार लेणे ।।"
> (ज्ञा. अ. 18, ओवी 1802–1805)

वरील ओव्यांचा सोप्या भाषेत कलीयुगात महाराष्ट्रात गोदावरी नदीच्या दक्षिण तीरावर जे एक पवित्र व पुरातन क्षेत्र आहे, जेथे सर्व जीवांची चालक श्रीमहालया (श्रीमोहिनीराज) आहे, जेथे यादववंशातील राजा रामदेवराय न्यायाने राज्य करीत आहे, तेथे सद्‌गुरू निवृत्तीनाथसुत (शिष्य) ज्ञानदेवाने गीतेवर मराठी भाषेचा साज चढवून टीका केलेली आहे. असा अर्थ करता येईल.

हे सारे वर्णन सध्याच्या 'नेवासा' या क्षेत्राला लागू पडते. गोदावरीच्या दक्षिण तीरावर व महालयाचे वास्तव्य असणारे क्षेत्र 'नेवासा' असू शकते, हे वर्णन 'आपेगाव' ला लागू पडत नाही हे येथे लक्षात येते. यामुळे लेखन स्थळाबाबत वाद असला तरी ज्ञानेश्वरीची रचना 'नेवासा' येथेच झाल्याचे सर्वमान्य आहे.

### *11. समारोप*

एकंदरीत सर्वसामान्य वारकरी संतांसाठी दीपस्तंभ असलेल्या, सामान्य वारकरी भक्तांना आपल्या 'ज्ञानेश्वरी', अभंगादी रचनांनी 'माऊली' वाटणाऱ्या आणि अभ्यासकांना ज्याच्या जन्मापासून वाङ्मयापर्यंत कोडे पडले आहे अशा संत ज्ञानेश्वरांचे स्थान मराठी साहित्यात अढळ मानावे लागते.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org